सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०)

# नगर स्थावर मालमत्ता कर (रद्द करणे) आणि सामान्य कर (कमाल दरात वाढ करणे) अधिनियम, १९६२

(१५ ऑगस्ट २०१३ पर्यंत सुधारित)

(Maharashtra Act No. XL OF 1962)

# The Urban Immovable Property Tax (Abolition) And General Tax (Increase of Maximum Rate) Act, 1962

(*As Modified upto the 15th August 2013*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक,
शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र शासन,
मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१३

(किंमत : रु. ५.००)

# नगर स्थावर मालमत्ता कर (रद्द करणे) आणि सामान्य कर (कमाल दरात वाढ करणे) अधिनियम, १९६२

## अनुक्रमणिका


| उद्देशिका | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| कलमे | | |
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. .. .. .. .. | १ |
| २. | सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याचा भाग ६ रद्द करणे. | १ |


(शा.म.मु.) एच ४११२ (६०९७—१-२०१४)

# सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०[१]

[नगर स्थावर मालमत्ता कर (रद्द करणे) आणि सामान्य कर (कमाल दरात वाढ करणे) अधिनियम, १९६२.]

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र सरकारच्या **राजपत्रात**" दिनांक २२ डिसेंबर १९६२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

[११ डिसेंबर १९६२]

**नगर स्थावर मालमत्ता कर रद्द करणे आणि मुंबई महानगरपालिकेस बृहन्मुंबईतील इमारतींवर व जमिनींवर सामान्य कराच्या ज्या कमाल दराने कर आकारता येईल अशा सामान्य कराच्या कमाल दरांत आणखी वाढ करणे, आणि तसेच उपरोक्त कारणांशी संबंधित असलेल्या बाबींची तरतूद करणे याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** नगर स्थावर मालमत्ता कर रद्द करणे आणि मुंबई महानगरपालिकेस बृहन्मुंबईतील इमारतींवर व जमिनींवर सामान्य कराच्या ज्या कमाल दराने कर आकारता येईल अशा सामान्य कराच्या कमाल दरांत आणखी वाढ करणे, आणि उपरोक्त कारणांशी संबंधित असलेल्या बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, नगर स्थावर मालमत्ता कर (रद्द करणे) आणि सामान्य कर (कमाल दरात वाढ करणे) अधिनियम, १९६२, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा[२] तारखेस अंमलात येईल.

सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याचा भाग ६ रद्द करणे.

१९३३ चा मुंबई **२.** (१) हा अधिनियम अंमलात आल्यावर, मुंबई वित्त अधिनियम, १९३२ (ज्याचा यात यापुढे " वित्त अधिनियम " असा उल्लेख करण्यात आला आहे), याचा भाग ६, रद्द होईल.

(२) वित्त अधिनियमाचा भाग ६ हा रद्द करण्यात आला असला तरीही, तो भाग आणि तद्न्वये किंवा तद्नुसार केलेले नियम किंवा दिलेले आदेश हे, नगर स्थावर मालमत्ता कर बसविणे, त्याची आकारणी करणे (यात पुन्हा केलेली आकारणी समाविष्ट असेल), त्यासंबंधी माफी देणे, तो वसूल करणे, त्यासंबंधी सूट व माफी देणे, किंवा असा कर परत करणे या कारणांकरितां, किंवा उक्त भाग अशा रीतीने रद्द करण्यापूर्वीच्या कोणत्याही मुदतीच्या संबंधात त्या भागान्वये द्यावयाच्या कोणत्याही दंडाच्या किंवा इतर कोणत्याही रकमेच्या कारणाकरिता, किंवा उपरोक्त कारणांपैकी कोणत्याही कारणांशी संबंधित किंवा त्यास आनुषंगिक असलेल्या कोणत्याही इतर कारणांकरिता परिणामक्षम असतील.

(३) पोट-कलम (२) च्या तरतुदींना बाध येऊ न देता आणि त्यास अधीन राहून, मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ यांचे कलम ७, हे वित्त अधिनियमाचा भाग ६ रद्द करण्यांत आल्याच्या संबंधात लागू होईल. (१९०४ चा मुंबई १.)

**३-४.** [कलम ३ व ४ याद्वारे करण्यात आलेल्या सुधारणा, अनुक्रमे मुंबई महानगरपालिका अधिनियम व मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ यांमध्ये अंतर्भूत करण्यात आल्या.]

---

१. उद्देश व कारणांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९६२, भाग पाच, इं. पृष्ठ ३३१ पहा.

२. १ एप्रिल १९६३ पहा शासकीय अधिसूचना, नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.बीएमसी.१०६१/ ५२०५७-सी, दिनांक २६ जानेवारी १९६३.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग,
  **मुंबई ४०० ००४.**
  दूरध्वनी : ०२२–२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९
- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  **पुणे ४११ ००१.**
  दूरध्वनी : ०२०–२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९
- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाइन्स,
  **नागपूर ४४० ००१.**
  दूरध्वनी : ०७१२–२५६२ ६१५
- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  **औरंगाबाद ४३१ ००१.**
  दूरध्वनी : ०२४०–२३३१ ४६८, २३३१ ५२५
- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  **कोल्हापूर ४१६ ००३.**
  दूरध्वनी : ०२३१–२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**